दैनिक
मनोरंजनासह प्रबोधनासाठी...
epaper.rayatsamachar.com

# रयत समाचार

खिंचों न कमानों को, न तलवार निकालो, जब तोप मुकाबिल हो, तो अख़बार निकालो - अकबर इलाहाबादी

संपादक : भैरवनाथ वाकळे | महाराष्ट्र, गोवा, कर्नाटक राज्यात एकाचवेळी प्रसिध्द होणारे दैनिक

• RNI No. MAHMAR/2011/40847 • वर्ष १३ वे • अंक ४७२ वा • बुधवार, ता. १७ डिसेंबर २०२५ • www.rayatsamachar.com • पाने ४ • मूल्य रु. ४.००

## महापालिकांसाठी राष्ट्रवादीची रणनीती

### सुप्रिया सुळे, अमोल कोल्हेंसह ७ नेत्यांवर जबाबदारी

**पुणे । रयत समाचार**

आगामी महापालिका निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाने निवडणुकीची तयारी सुरू करत पहिलं पाऊल टाकलं आहे. राज्यातील महत्त्वाच्या महापालिकांसाठी पक्षाकडून निरीक्षकांची नियुक्ती करण्यात आली असून, यामध्ये सात ज्येष्ठ व अनुभवी नेत्यांची जबाबदारी निश्चित करण्यात आली आहे.



पक्षप्रमुख शरद पवार यांच्या मार्गदर्शनाखाली निरीक्षकांनी स्थानिक पातळीवरील राजकीय परिस्थिती, युती-आघाडीचे पर्याय आणि पक्षाची ताकद यांचा आढावा घ्यावा, तसेच लवकरात लवकर अहवाल सादर करावा, अशा सूचना देण्यात आल्या आहेत. पुढील तीन ते चार दिवसांत स्थानिक समीकरणांचा सखोल अभ्यास करून निरीक्षकांनी पक्ष नेतृत्वाला माहिती देणे अपेक्षित आहे.

पक्षाने जाहीर केलेल्या निरीक्षकांमध्ये पुणे महापालिकेसाठी खासदार सुप्रिया सुळे, पिंपरी-चिंचवडसाठी खासदार अमोल कोल्हे, ठाणे महापालिकेसाठी जितेंद्र आव्हाड, सांगलीसाठी जयंत पाटील, नागपूरसाठी अनिल देशमुख, नवी मुंबईसाठी प्रदेशाध्यक्ष शशिकांत शिंदे तर चंद्रपूर महापालिकेसाठी अमर काळे यांची नियुक्ती करण्यात आली आहे.

बहुतेक निरीक्षकांना त्यांच्या कार्यक्षेत्रातील किंवा गृहजिल्ह्यातील महापालिकांची जबाबदारी देण्यात आली आहे. यामुळे स्थानिक राजकारणाची सखोल माहिती आणि संघटनात्मक ताकद वापरून निवडणुकीची रणनीती आखली जाणार आहे. विशेषतः पुणे व पिंपरी-चिंचवडसारख्या मोठ्या महापालिकांमध्ये युती-आघाडीच्या शक्यता तपासण्यावर भर देण्यात येणार आहे.

या निर्णयामुळे राष्ट्रवादी काँग्रेसने महापालिका निवडणुकांच्या दृष्टीने संघटनात्मक हालचालींना गती दिल्याचे स्पष्ट झाले आहे.

## मुंबई महापालिकेत युती अडचणीत; भाजपकडून शिंदेंच्या सेनेला फक्त ५२ जागा

**मुंबई । रयत समाचार**

राज्य निवडणूक आयोगाने मुंबईसह राज्यातील २९ महापालिकांच्या निवडणुकांचा कार्यक्रम जाहीर केल्यानंतर राजकीय हालचालींना वेग आला आहे. या पार्श्वभूमीवर मुंबई महापालिकेच्या निवडणुकीसाठी भाजप आणि एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वाखालील शिवसेना यांच्यात पहिली महत्त्वपूर्ण बैठक पार पडली. मात्र या बैठकीत जागावाटपावरून शिंदेसेनेला अपेक्षेपेक्षा कमी प्रस्ताव समोर आल्याने युतीतील तणाव उघड झाला आहे.

विश्वसनीय सूत्रांच्या माहितीनुसार, भाजपकडून शिंदेसेनेला महापालिकेतील फक्त ५२ जागांचा प्रस्ताव देण्यात आला आहे. यामुळे शिवसेनेला मोठा धक्का बसल्याची चर्चा राजकीय वर्तुळात सुरू आहे. शिवसेनेची मागणी किमान १२५ जागांची असून, भाजप मात्र सुमारे १५० हून अधिक जागांवर स्वबळावर लढण्याच्या भूमिकेत आहे. तसेच भाजपच्या कोट्यातून



रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडियाला दोन ते तीन जागा देण्याचाही विचार असल्याचे समजते. दादर येथील वसंत स्मृती येथे दुपारी झालेल्या या बैठकीत मुंबई महापालिकेच्या निवडणुकीतील जागावाटपाबरोबरच प्रचार रणनीतीवरही चर्चा झाली. २०१७ मध्ये निवडून आलेले शिवसेनेचे सुमारे ४७ नगरसेवक सध्या शिंदे गटात असल्याने, त्यांच्या प्रभावाच्या आधारे भाजपने ५२ जागांचा आकडा पुढे केल्याची माहिती आहे.

दरम्यान, ठाकरेंच्या शिवसेनेत असलेल्या माजी नगरसेवकांच्या जागा शिंदे गटाला देण्यास भाजप अनुकूल नसल्याचे स्पष्ट झाल्याने पुढील चर्चांमध्ये वाद होण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. येत्या काही दिवसांत वॉर्डनिहाय चर्चा होणार असून त्यानंतरच अंतिम जागावाटप निश्चित होणार आहे. २०१७ च्या महापालिका निवडणुकीत शिवसेनेने ८४ तर भाजपने ८२ जागा जिंकल्या होत्या. यावेळी मात्र राजकीय समीकरणे पूर्णपणे बदलली असून ठाकरे बंधू एकत्र येण्याची शक्यता आणि महाविकास आघाडीची भूमिका यामुळे मुंबईतील लढत अधिकच रंगतदार होण्याची चिन्हे आहेत.

## क्रांतिसिंह नाना पाटील यांना मरणोत्तर जीवनगौरव पुरस्कार



**मुंबई । रयत समाचार**

भारतीय कम्युनिस्ट पक्षाच्या स्थापनेला शंभर वर्षे पूर्ण झाल्यानिमित्त भायखळा येथे आयोजित शतक महोत्सवी कार्यक्रमात स्वातंत्र्यलढ्यातील थोर क्रांतिकारक क्रांतिसिंह नाना पाटील यांना मरणोत्तर जीवनगौरव पुरस्कार जाहीर करण्यात आला. हा पुरस्कार स्वीकारण्यासाठी त्यांच्या कुटुंबियांच्या वतीने प्रतिनिधी म्हणून ॲड. सुभाष पाटील यांना उपस्थित राहण्याचे निमंत्रण देण्यात आले होते.

यावेळी मुंबई विद्यापीठाचे माजी कुलगुरू, ज्येष्ठ अर्थतज्ज्ञ व सामाजिक विचारवंत डॉ. भालचंद्र मुनगेकर यांच्या हस्ते सन्मान प्रदान करण्यात आला. शंभर वर्षांच्या लढ्याचा, त्यागाचा आणि विचारांचा गौरव करणारा हा क्षण उपस्थित कार्यकर्ते व नागरिकांसाठी प्रेरणादायी ठरला.

यावेळू मंचावर ज्येष्ठ नेते कॉ. मिलिंद कुलकर्णी, ॲड. कॉ. सुभाष लांडे, कॉ. निंबाळकर, कॉ. क्रांती जेजुरीकर यांच्यासह पक्षाचे अनेक ज्येष्ठ व तरुण कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते. यावेळी क्रांतिसिंह नाना पाटील यांच्या स्वातंत्र्यलढ्यातील योगदानावर, शोषितांच्या हक्कांसाठी दिलेल्या संघर्षावर आणि त्यांच्या क्रांतिकारी विचारांवर वक्त्यांनी प्रकाश टाकला.

भारतीय कम्युनिस्ट पक्षाच्या शतक महोत्सवाच्या निमित्ताने आयोजित हा सोहळा केवळ सन्मानाचा नव्हे, तर नव्या पिढीला सामाजिक न्याय, समता व लोकशाही मूल्यांची आठवण करून देणारा ठरला. क्रांतिसिंह नाना पाटील यांच्या स्मृतींना अभिवादन करत उपस्थितांनी त्यांच्या विचारांचा वारसा पुढे नेण्याचा संकल्प केला.

## नॅशनल हेराल्ड प्रकरणी गांधी कुटुंबाला दिलास

**नवी दिल्ली । रयत समाचार**

नॅशनल हेराल्ड प्रकरणात काँग्रेस नेत्या सोनिया गांधी आणि राहुल गांधी यांना दिल्लीतल्या राऊस अव्हेन्यू न्यायालयाकडून मोठा दिलासा मिळाला. विशेष न्यायाधीश विशाल गोगणे यांनी अंमलबजावणी संचालनालयाने (ईडी) दाखल केलेल्या आरोपपत्राची दखल घेण्यास नकार दिला आहे. त्यामुळे सध्या तरी या आरोपांच्या आधारे कोणतीही कारवाई होणार नाही. न्यायालयाने स्पष्ट केले की, ईडीला तपास सुरू ठेवण्याचा अधिकार आहे, मात्र सध्याच्या आरोपपत्रावर कारवाई शक्य नाही. भाजप नेते सुब्रमण्यम स्वामी यांनी २०१२ मध्ये मनी लॉन्ड्रिंग आणि आर्थिक गैरव्यवहाराचे आरोप केल्यानंतर या प्रकरणाचा तपास सुरू झाला होता.

## ब्राझीलमध्ये वादळी तुफानात

### स्टॅच्यु ऑफ लिबर्टीची प्रतिकृती कोसळली


**गुआयबा । रयत समाचार**

ब्राझीलच्या दक्षिण भागात सोमवारी दुपारी आलेल्या जोरदार वादळी वाऱ्यामुळे स्टॅच्यु ऑफ लिबर्टीची भव्य प्रतिकृती कोसळल्याची घटना घडली. गुआयबा शहरातील हावन मेगास्टोरसमोर उभारलेली ही प्रतिकृती वाऱ्याच्या प्रचंड वेगामुळे प्रथम वाकली आणि काही क्षणांतच थेट जमिनीवर कोसळली. या घटनेचा थरारक व्हिडीओ सध्या सोशल मीडियावर मोठ्या प्रमाणात व्हायरल होत आहे. माहितीनुसार, पायासह या पुतळ्याची एकूण उंची सुमारे ४० मीटर होती. वादळाच्या वेळी ताशी सुमारे ९० किलोमीटर वेगाने वारे वाहत असल्याचे हवामान खात्याने सांगितले. जोरदार वाऱ्यामुळे पुतळ्याचा सुमारे २४ मीटर उंचीचा वरचा भाग कोसळला, तर ११ मीटर उंचीचा पायथा (पेडेस्टल) मात्र सुरक्षित राहिला. पुतळा कोसळल्यानंतर त्याचे डोके तुटून वेगवेगळ्या ठिकाणी पडल्याचे दिसून आले. सुदैवाने या घटनेत कोणतीही जीवितहानी किंवा दुखापत झाली नसल्याचे प्रशासनाने स्पष्ट केले आहे. घटनेच्या वेळी परिसरातील वाहतूक सुरू होती, मात्र खबरदारी घेण्यात आल्याने मोठा अनर्थ टळला.

## सदनिका घोटाळाप्रकरणी क्रीडामंत्री माणिक कोकाटेंना दोन वर्षांची शिक्षा

**नाशिक । रयत समाचार**

शासकीय कोट्यातील सदनिका गैरव्यवहारप्रकरणी राज्याचे क्रीडामंत्री माणिकराव कोकाटे यांच्या अडचणीत वाढ झाली असून, नाशिक जिल्हा सत्र न्यायालयाने त्यांना सुनावलेली दोन वर्षांची कारावासाची शिक्षा कायम ठेवली आहे. प्रथम वर्ग न्यायालयाने दिलेल्या निकालाविरोधात कोकाटे यांनी दाखल केलेले अपील फेटाळून लावत सत्र न्यायालयाने मंगळवारी हा महत्त्वपूर्ण निर्णय दिला.



मुख्यमंत्री कोट्यातून अल्प उत्पन्न गटासाठी असलेल्या सदनिकांचे बनावट दस्तऐवज तयार करून लाभ घेतल्याप्रकरणी माणिकराव कोकाटे आणि त्यांचे भाऊ विजय कोकाटे यांना प्रत्येकी दोन वर्षांचा कारावास व ५० हजार रुपयांचा दंड प्रथम वर्ग न्यायालयाने ठोठावला होता. या शिक्षेला आव्हान देत कोकाटे यांनी जिल्हा सत्र न्यायालयात धाव घेतली होती. मात्र, सत्र न्यायाधीश पी. एम. बदर यांनी प्रथम वर्ग न्यायालयाचा निकाल योग्य ठरवत शिक्षा कायम ठेवली.

माणिकराव कोकाटे गेल्या काही महिन्यांपासून विविध वादांमुळे चर्चेत आहेत. विधिमंडळ अधिवेशनादरम्यान मोबाईलवर पत्त्यांचा खेळ खेळतानाचा व्हिडीओ व्हायरल झाल्यानंतर त्यांनी स्पष्टीकरण दिले होते. त्यानंतर त्यांच्याकडील कृषिमंत्रीपदाचा पदभार काढून घेण्यात येऊन क्रीडामंत्रीपदाची जबाबदारी देण्यात आली होती. अशातच आता सदनिका घोटाळ्याप्रकरणी शिक्षा कायम राहिल्याने त्यांच्या राजकीय अडचणी वाढल्या आहेत.

**सदनिका प्रकरण नेमके काय?**

सुमारे ३० वर्षांपूर्वी नाशिक शहरातील कॅनडा कॉर्नर परिसरातील 'न्यू व्ह्यू अपार्टमेंट' या इमारतीत मुख्यमंत्री कोट्यातून अल्प उत्पन्न गटासाठीच्या सदनिका माणिकराव कोकाटे, त्यांचे भाऊ विजय कोकाटे तसेच अन्य दोन व्यक्तींना देण्यात आल्या होत्या. या वाटपात नियमबाह्य पद्धतीने लाभ घेतल्याचा आरोप करण्यात आला होता. तत्कालीन राज्यमंत्री तुकाराम दिघोळे यांच्या तक्रारीनंतर जिल्हा प्रशासनाने चौकशी केली होती. या चौकशीनंतर न्यायालयीन प्रक्रिया सुरू झाली आणि अखेर कोकाटे बंधूंना कारावास व दंडाची शिक्षा सुनावण्यात आली.

प्रथम वर्ग न्यायालयाचा निकाल सत्र न्यायालयानेही कायम ठेवल्याने माणिकराव कोकाटे यांच्यावर राजकीय दबाव वाढण्याची शक्यता व्यक्त होत आहे.

## नगर, नाशिकमधे, कडाक्याची थंडी


**मुंबई । रयत समाचार**

राज्यभरात गेल्या काही दिवसांपासून थंडीचा जोर कायम असून नाशिक, अहिल्यानगरसह मध्य महाराष्ट्रात कडाक्याची थंडी जाणवत आहे. अनेक भागांत किमान तापमान ८ ते १० अंश सेल्सिअसपर्यंत घसरल्याने नागरिकांना हुडहुडी भरली आहे. थंडीपासून बचावासाठी सकाळी आणि रात्री शेकोट्या पेटवण्याचे चित्र अनेक ठिकाणी पाहायला मिळत आहे. प्रादेशिक हवामान केंद्राच्या माहितीनुसार नाशिक आणि अहिल्यानगर येथे किमान तापमान ८.८ अंश सेल्सिअस इतके नोंदवण्यात आले, तर पुण्यात ९.४ अंश सेल्सिअस तापमानाची नोंद झाली. मराठवाडा आणि विदर्भातील अनेक जिल्ह्यांमध्येही तापमान १० अंशांच्या आसपास राहिल्याने थंडीची तीव्रता वाढली आहे. गेल्या चार दिवसांपासून राज्यात थंडीची लाट होती. ही लाट काहीशी ओसरली असली तरी हवेतील गारठा अद्याप कायम आहे. हवामान तज्ज्ञांच्या माहितीनुसार, सध्या वायव्य भारतातून येणाऱ्या थंड वाऱ्यांचा परिणाम महाराष्ट्रावर जाणवत आहे.

हवामान विभागाच्या अंदाजानुसार, येत्या २४ तासांत किमान तापमानात दोन ते तीन अंशांनी किंचित वाढ होण्याची शक्यता आहे. मात्र, पुढील दोन दिवस तापमानात फारसा बदल होणार नसून गारठा कायम राहणार आहे.

## नेहरू सेंटरमध्ये कै. शिवाजी तुपे यांच्या चित्रांचे भव्य प्रदर्शन

### रंगांच्या फराट्यातून उलगडलेलं संवेदनशील मन




**मुंबई । रयत समाचार**

नाशिकचे मूळ रहिवासी आणि सुप्रसिद्ध चित्रकार कै. शिवाजी तुपे यांच्या चित्रकलेचा समृद्ध वारसा रसिकांसमोर आणणारे ३१ वे 'इंडियन मास्टर्स रेट्रोस्पेक्टिव्ह' हे चित्रप्रदर्शन नेहरू सेंटर, वरळी येथे आयोजित करण्यात आले आहे. या प्रदर्शनाचे उद्घाटन मंगळवारी ता. १७ डिसेंबर रोजी सायंकाळी ५ वाजता नेहरू सेंटरच्या कार्यकारी समितीचे सदस्य नरेंद्र मुरकुंबी यांच्या हस्ते होणार असून, यावेळी प्रदर्शनाचा अधिकृत कॅटलॉगही प्रकाशित करण्यात येणार आहे.


राजेंद्र सूर्यवंशी यांनी कै. शिवाजी तुपे यांच्या आठवणींना उजाळा देताना सांगितले, शिवाजी तुपे हे त्यांचे दिवंगत वडील रामचंद्र लक्ष्मण सूर्यवंशी यांचे बालमित्र होते. वडिलांच्या हयातीत आणि त्यांच्या निधनानंतरही या जिव्हाळ्याच्या नात्यांचा संपर्क जपण्याचा प्रयत्न आपण केला, असे त्यांनी नमूद केले. ते पुढे म्हणाले, अत्यंत हळव्या मनाचा शिवाकाका आपल्या पेंटिंगमध्ये स्वतःचे अंतरंग उलगडून दाखवायचा. शब्दांऐवजी रंगांच्या फराट्यातून भावना, वेदना आणि सौंदर्य ते प्रभावीपणे मांडायचे.

हे चित्रप्रदर्शन नेहरू सेंटर आर्ट गॅलरी, डिस्कव्हरी ऑफ इंडिया बिल्डिंग, डॉ. ॲनी बेझंट रोड, वरळी, मुंबई येथे भरविण्यात आले असून, ते २९ डिसेंबर २०२५ पर्यंत रसिकांसाठी खुले राहणार आहे. दररोज सकाळी ११ ते सायंकाळी ७ वाजेपर्यंत (ए.सी. गॅलरी) हे प्रदर्शन पाहता येणार आहे.

## वारकरी धर्माचा ७०० वर्षांचा इतिहास जिवंत; 'विठोबा मिसिंग इन पंढरपूर'चा प्रकाशन सोहळा

**पुणे । रयत समाचार**

वारकरी धर्माचा सुमारे सातशे वर्षांचा प्रदीर्घ, वैचारिक व सामाजिक इतिहास अत्यंत रसाळ आणि संदर्भसमृद्ध पद्धतीने मांडणारी विनायक होगाडे लिखित 'विठोबा मिसिंग इन पंढरपूर' ही कादंबरी वाचकांच्या हाती आली असून, तिचा प्रकाशन सोहळा नुकताच पत्रकार भवन, पुणे येथे रविवारी ता. १४ डिसेंबर उत्साहात पार पडला. यावेळी प्रविण बांदेकर, प्राजक्ता हनमघर, ह.भ.प. ज्ञानेश्वर बंडगर महाराज, मधुश्रीचे शरद अष्टेकर, विनायक होगाडे मंचावर उपस्थित होते.



मधुश्री पब्लिकेशनतर्फे प्रकाशित झालेल्या या ३६८ पानांच्या कादंबरीच्या प्रकाशनप्रसंगी प्रख्यात लेखक, साहित्यिक, अभ्यासक व वाचक मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमात ह.भ.प. ज्ञानेश्वर बंडगर यांनी कादंबरीतील आशय, मांडणी आणि सामाजिक आशयावर सविस्तर भाष्य केले.

यावेळी बोलताना ज्ञानेश्वर बंडगर म्हणाले, ऐतिहासिक विषयांवर लिहिताना अनेकदा तथ्यांची मोडतोड होते. मात्र 'विठोबा मिसिंग इन पंढरपूर' ही त्याला ठळक अपवाद ठरणारी कादंबरी आहे. वारकरी संप्रदायाचा ७०० वर्षांचा इतिहास कोणतीही ऐतिहासिक विकृती न करता, प्रामाणिकपणे आणि अभ्यासपूर्ण पद्धतीने येथे मांडण्यात आला आहे.

ते पुढे म्हणाले, पारंपरिक इतिहासलेखनातील कोरडेपणा टाळत लेखकाने कादंबरीचा प्रभावी फॉर्म वापरला असून, त्यामुळे संपूर्ण इतिहास एक सशक्त कथानक म्हणून वाचकांसमोर उभा राहतो. नामदेवरायांपासून तुकोबारायांपर्यंत, तसेच चोखोबाराय, जनाबाई, कान्होपात्रा, एकनाथराय यांच्यापासून थेट गाडगेबाबा आणि साने गुरुजींपर्यंतची संतपरंपरा या कादंबरीत सुरेखपणे गुंफलेली आहे. गणपती महाराज अजात, निळू फुले यांसारखे आधुनिक संदर्भही कथेत सहजतेने पेरले गेले आहेत.

कादंबरी ऐतिहासिक असली तरी तिची दृष्टी समकालीन आहे. संकुचित धर्मवादी राजकारण, धार्मिक दांभिकता, अंधश्रद्धा, जातीय व लैंगिक भेदभाव यांवर ती ठामपणे बोट ठेवते. मनोरंजनाबरोबरच प्रबोधनाची भूमिका बजावणारी ही कादंबरी असल्याचे मत उपस्थित मान्यवरांनी व्यक्त केले.

कादंबरीचे मुखपृष्ठ हर्षद मराठे यांनी रेखाटले असून, आतील रेखाटने भार्गव कुलकर्णी यांची आहेत. मांडणी व सजावट ममता झांजुर्णे-भोसले यांनी केली असून, सुलेखन प्रभाकर भोसले यांचे आहे. निर्मितीमूल्य, मांडणी आणि चित्रांबाबतही कादंबरी विशेष लक्षवेधी ठरते. वारकरी संप्रदायाविषयी आजवर जे काही वाचण्यात आले, त्यात सर्वाधिक सकस आणि समग्र लेखन म्हणून ही कादंबरी ठरेल, असे गौरवोद्गार ह.भ.प. ज्ञानेश्वर बंडगर यांनी काढले.

एकूणच, 'विठोबा मिसिंग इन पंढरपूर' ही कादंबरी साहित्यविश्वात महत्त्वाची भर घालणारी ठरत असून, अभ्यासक, वाचक आणि वारकरी परंपरेशी नाते असलेल्या सर्वांसाठी ती वाचनीय ठरणार आहे.

## शिव उद्योग संघटनेतर्फे महिलांच्या चपाती उद्योगाला नवी दिशा

### रोजगार गावात, प्रगती महाराष्ट्रात

**मुंबई । गुरुदत्त वाकदेकर**

शिव उद्योग संघटनेतर्फे महिलांनी स्वतःच्या हाताने, घरगुती पद्धतीने तयार केलेल्या ताज्या व दर्जेदार चपात्या १ जानेवारी २०२६ पासून (मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण) परिसरात रिटेल तसेच होलसेल स्वरूपात विक्रीसाठी उपलब्ध होणार आहेत. या उपक्रमामुळे महिलांच्या घरगुती उद्योगाला व्यावसायिक स्तरावर नवी संधी मिळणार आहे.

महिलांना आर्थिकदृष्ट्या सक्षम बनवणे, स्वावलंबनाची संधी उपलब्ध करून देणे आणि स्थानिक पातळीवर मोठ्या प्रमाणात रोजगारनिर्मिती करणे, हा या उपक्रमाचा मुख्य उद्देश आहे. घरबसल्या उद्योग करून महिलांना सन्मानजनक उत्पन्न मिळावे, यासाठी शिव उद्योग संघटनेने हा अभिनव आणि सामाजिकदृष्ट्या महत्त्वाचा उपक्रम हाती घेतला आहे. या उपक्रमांतर्गत स्वच्छता, गुणवत्ता आणि परंपरागत चव जपून महिलांनी तयार केलेल्या चपात्या हॉटेल, खानावळ, डबेवाल्यांचे व्यवसाय, कॅन्टीन, कार्यालये, हॉस्टेल तसेच सर्वसामान्य ग्राहकांसाठी उपलब्ध करून दिल्या जाणार आहेत. घरगुती स्वरूपात तयार होणाऱ्या या चपात्यांना व्यापक बाजारपेठ मिळवून देण्याचा संघटनेचा प्रयत्न आहे. शिव उद्योग संघटनेतर्फे सर्व नागरिक, व्यापारी, व्यावसायिक, हॉटेल चालक, संस्था आणि सामाजिक संघटनांना महिलांच्या या उपक्रमाला सहकार्य, पाठिंबा आणि आशीर्वाद देण्याचे आवाहन करण्यात आले आहे. अनेक कुटुंबांचे आर्थिक भवितव्य सक्षम होईल, असा विश्वास व्यक्त करण्यात आला आहे. अधिक माहितीसाठी संपर्क : ९७०२०५८९३०.




# जागतिक रोबोटिक्स चॅम्पियनशिपवर भारताचा झेंडा

## दिया छाजेड, इशिका अडसूळ यांचा ७० देशांत पहिला क्रमांक

**अहमदनगर । विजय मते**

उत्तर युरोप खंडातील एस्टोनिया देशात दरवर्षी आयोजित करण्यात येणाऱ्या प्रतिष्ठेच्या जागतिक रोबोटिक्स चॅम्पियनशिप स्पर्धेत अहिल्यानगरच्या दिया प्रीतम छाजेड व इशिका अभिजीत अडसूळ या दोन भारतीय विद्यार्थिनींनी दैदीप्यमान यश संपादन केले आहे. जगातील ७० देशांतील दोन हजारांहून अधिक विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदवलेल्या या आंतरराष्ट्रीय स्पर्धेत दोघींनीही सर्व फेऱ्या यशस्वीरीत्या पार करत प्रथम क्रमांक पटकावून भारताचा तिरंगा अभिमानाने उंचावला आहे.



यापूर्वी भारतात पार पडलेल्या राष्ट्रीय रोबोटिक्स स्पर्धेत दियाने उल्लेखनीय कामगिरी केली होती. पुणे जिल्ह्यातील लोणी काळभोर येथील एमआयटी वर्ल्ड पीस विद्यापीठात झालेल्या राष्ट्रीय स्पर्धेत तिने प्रथम क्रमांक पटकावत आंतरराष्ट्रीय स्पर्धेसाठी पात्रता मिळवली होती. इशिका अडसूळ हिनेही राष्ट्रीय पातळीवर उत्कृष्ट कामगिरी करत जागतिक स्पर्धेचे दार खुले केले होते.

दियाने तयार केलेला मोबाईलवर ऑपरेट होणारा शेतीसाठी उपयुक्त रोबोट हा स्पर्धेतील विशेष आकर्षण ठरला. हा रोबोट पेरणी, फवारणी व नांगरणी यासारखी कामे करू शकतो. तसेच तापमान, हवामान बदल व आर्द्रता मोजण्याची क्षमताही त्यामध्ये आहे.

एस्टोनिया येथे झालेल्या या जागतिक स्पर्धेत दहा विविध कॅटेगिरींमध्ये सर्व वयोगटांतील स्पर्धक सहभागी झाले होते. अमेरिका, युरोप व आशिया खंडातील प्रगत देशांचे अत्याधुनिक तंत्रज्ञानाने सज्ज संघ या स्पर्धेत उतरले होते. मात्र नावीन्यपूर्ण कल्पना, सादरीकरण, आत्मविश्वासाच्या जोरावर दिया व इशिका यांनी या सर्व संघांना मागे टाकत अंतिम विजेतेपद मिळवले. या यशाबद्दल दोघींना मिळून एक लाख रुपयांचे रोख पारितोषिक व प्रशस्तीपत्र देण्यात आले असून, लवकरच सुवर्णपदकही प्रदान करण्यात येणार आहे. मूळची अहिल्यानगरची असलेली दिया सध्या बारामती येथील विद्या प्रतिष्ठानच्या विनोदकुमार गुजर बाल विकास मंदिर प्रशालेत इयत्ता नववीत शिकत असून आई शितल छाजेड, वडील प्रीतम छाजेड व शिक्षिका आस्मा मॅडम यांचे तिला मार्गदर्शन लाभले आहे. इशिका अडसूळ हिलाही पालक व शिक्षकांचे भक्कम पाठबळ लाभले आहे. या ऐतिहासिक यशामुळे नगर जिल्ह्यातून अभिनंदन होत आहे.

# ग्रेस म्युझिक ॲकॅडमीचा चौथा वार्षिक म्युझिकल उत्सव उत्साहात



**अहमदनगर । आबीद खान**

संगीताला भाषा नसते; मात्र ते मन लावून ऐकले, तर ते प्रत्येकाला भावते. सुख-दु:खाच्या क्षणी मनाला प्रसन्नता देणारे संगीत जीवनात सकारात्मक ऊर्जा निर्माण करते. ग्रेस म्युझिक ॲकॅडमी आंतरराष्ट्रीय स्तरावरील संगीत परीक्षांच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना संधी उपलब्ध करून देत असून, यामुळे संगीत संस्कृतीचे आदान-प्रदान होत आहे. देश-विदेशातील संगीत समजून घेण्याची संधी विद्यार्थ्यांना मिळत असून, आंतरराष्ट्रीय स्पर्धांमध्ये विद्यार्थ्यांनी मिळविलेले यश कौतुकास्पद असल्याची भावना पालक व नगरकरांनी व्यक्त केली.

येथील ग्रेस म्युझिक ॲकॅडमीचा चौथा वार्षिक म्युझिकल उत्सव उत्साहात पार पडला. या उत्सवासाठी प्रमुख पाहुणे म्हणून डॉन बॉस्को विद्यालयाचे मुख्याध्यापक फादर अजित मुनीस, संत आन्ना चर्चचे पॅरिश प्रिस्ट फादर मॅक्नरो लोपीस, हारमोनी इंटरनॅशनल स्कूलचे मुख्याध्यापक अशोक बेरड, संत जॉन चर्चचे पॅरिश प्रिस्ट फादर विश्वास परेरा तसेच ग्रेस फाउंडेशनचे सेक्रेटरी लिओ पंडित उपस्थित होते.

प्रास्ताविकात पिटर पंडित यांनी सांगितले की, ग्रेस म्युझिक ॲकॅडमी ही अहमदनगर जिल्ह्यातील एकमेव ॲकॅडमी असून ती लंडन येथील ट्रिनिटी कॉलेजशी संलग्न आहे. चौथ्या वार्षिक म्युझिकल उत्सवाच्या निमित्ताने आंतरराष्ट्रीय संगीत परीक्षेत यश मिळवलेल्या ३२ विद्यार्थ्यांना ट्रिनिटी कॉलेज, लंडनचे प्रमाणपत्र देऊन सन्मानित करण्यात आले. तसेच ५२ विद्यार्थ्यांना ॲकॅडमीचे प्रमाणपत्र देऊन गौरविण्यात आले. यावेळी विद्यार्थ्यांनी ॲकॅडमीत शिकलेल्या संगीतकलेचे उत्कृष्ट सादरीकरण उपस्थितांसमोर केले. मराठी, हिंदी व इंग्रजी गीतांच्या सादरीकरणाने कार्यक्रमात रंगत आली असून उपस्थितांनी टाळ्यांच्या गजरात विद्यार्थ्यांचे कौतुक केले.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन विणा दिघे यांनी केले, तर आभार सोनाली पंडित यांनी मानले.

# लेखक- वाचक संवादाचा सेतू उभारणारा उपक्रम

## डॉ. कळमकर यांच्यासोबत संवादाची संधी

**अहमदनगर । रयत समाचार**

लेखक आणि वाचक यांच्यातील थेट संवाद अधिक दृढ व्हावा, या उद्देशाने ज्ञानकौशल्य ट्रस्टतर्फे लेखक-वाचक संवाद कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. मंगळवारी ता. २३ डिसेंबर रोजी सायंकाळी ५ वाजता, जिल्हा वाचनालयाच्या सावेडी येथील सभागृहात होणाऱ्या या पहिल्याच कार्यक्रमात प्रसिद्ध साहित्यिक व व्याख्याते डॉ. संजय कळमकर यांच्याशी वाचकांना मनमोकळ्या गप्पा मारता येणार आहेत, अशी माहिती ट्रस्टचे अध्यक्ष व लेखक सचिन मोहन चोभे यांनी दिली.

अध्यक्षस्थानी नाट्य अभिनेते तसेच ॲम्बिशन करिअर अकॅडमीचे संचालक प्रा. रवींद्र काळे हे राहणार आहेत. सध्या वाचन संस्कृती लोप पावत असल्याची चर्चा असली, तरी प्रत्यक्षात पुस्तकांची विक्री वाढत असल्याचे चित्र आहे. याचा अर्थ आजही वाचक आहेत, नवी पिढी वाचते आहे; मात्र लेखकांशी थेट संवादाची संधी कमी होत चालली आहे. हीच दरी भरून काढण्यासाठी आणि साहित्यिक व साहित्यरसिक यांच्यातील संवाद वाढवण्यासाठी अशा उपक्रमांची गरज असल्याचे चोभे यांनी नमूद केले. दर महिन्याला नगरमधील वाचकांना त्यांच्या आवडत्या लेखकांशी थेट संवाद साधण्याची संधी मिळावी, तसेच या संवादातून नवे साहित्यिक घडावेत, या व्यापक उद्देशाने ज्ञानकौशल्य ट्रस्टतर्फे ही मालिका राबविण्यात येणार आहे.

वाचकप्रिय लेखक डॉ. संजय कळमकर यांच्या ‘असो’ या कादंबरीसह ‘आनंदाच्या वाटा’ या ललित लेखसंग्रहाचे नुकतेच प्रकाशन झाले असून, या पुस्तकांसह त्यांच्या एकूण लेखनप्रवासावर या कार्यक्रमात सविस्तर चर्चा होणार आहे. पुणे- मुंबईसारख्या शहरांत असे साहित्य संवाद नियमित होत असले, तरी नगरमध्ये त्यांचे प्रमाण कमी आहे. त्यामुळे शहर व जिल्ह्यातील वाचन संस्कृती अधिक समृद्ध करण्यासाठी हा उपक्रम महत्त्वाचा ठरणार आहे.

या कार्यक्रमास शहरासह संपूर्ण जिल्ह्यातील वाचकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन ज्ञानकौशल्य ट्रस्टतर्फे करण्यात आले आहे.

# आनंद पार्श्व प्री-स्कूलचे वार्षिक स्नेहसंमेलन उत्साहात



**अहमदनगर । पंकज गुंदेचा**

राष्ट्रसंत आचार्य प.पू. आनंदऋषीजी म.सा., महाराष्ट्र प्रवर्तक प.पू. कुंदनऋषीजी म.सा. व संस्कारप्रेरक प.पू. आलोकऋषीजी म.सा. यांच्या आशीर्वादाने कार्यरत असलेल्या नवीपेठ येथील आनंद पार्श्व प्री-स्कूलचे ९ वे वार्षिक स्नेहसंमेलन अत्यंत उत्साहपूर्ण वातावरणात पार पडले.

कार्यक्रमाची सुरुवात ऋषीजींच्या पावन नवकार मंत्र जपाने करण्यात आली. त्यानंतर दीपप्रज्वलन करून स्नेहसंमेलनाचे औपचारिक उद्घाटन झाले. यावेळी निर्मल बाफना, मेघा बोरा, इच्छाबाई बोरा, लताबाई बोरा, सुप्रिया छल्लाणी, सुशीला बाफना, प्रभावती मुथा, अशोक पगारिया, मनोज शेटिया, मनोज बाफना, संजय चोपडा, सचिन बोरा, मोहन बरमेचा तसेच आनंद पार्श्व प्री-स्कूलच्या प्राचार्य ज्योती पुरी यांच्यासह मान्यवर मोठ्या संख्येने उपस्थित होते.

कार्यक्रमाच्या प्रारंभी शाळेचे मार्गदर्शक व प्रेरणास्थान असलेले ट्रस्टी स्व. रमेशचंद्र बाफना यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून त्यांच्या स्मृतीस भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण करण्यात आली. प्राचार्य ज्योती पुरी यांनी उपस्थितांचे स्वागत केले. स्नेहसंमेलनात चिमुकल्या विद्यार्थ्यांनी सादर केलेल्या भक्तिमय व सांस्कृतिक कार्यक्रमांनी उपस्थितांची मने जिंकली. गणेश वंदनेने कार्यक्रमाची सुरुवात झाली. त्यानंतर स्वागत गीत, ‘माय भवानी’, ‘की जो केसरी के लाल’ तसेच ‘अच्युतम केशवम’ या गीतांवरील नृत्य सादरीकरणाने कार्यक्रमात विशेष रंगत आणली.

मागील दोन वर्षांपासून शाळेच्या अभ्यासक्रमात भगवद्गीता पारायणाचा समावेश करण्यात आला असून, त्याची मौखिक परीक्षाही घेतली जाते. यावेळी विद्यार्थ्यांनी भगवद्गीता पारायणाचे उत्कृष्ट सादरीकरण करून उपस्थितांकडून भरभरून दाद मिळवली व ‘वन्स मोअर’चा मान मिळवला.

प्रमुख पाहुण्यांनी शाळेत दिल्या जाणाऱ्या संस्कारक्षम शिक्षणाचे तसेच विद्यार्थ्यांच्या अंगभूत कलागुणांना वाव देणाऱ्या उपक्रमांचे विशेष कौतुक केले. शाळेच्या को-ऑर्डिनेटर मेघा बोरा या प्रत्येक कार्यक्रम व उपक्रमासाठी उत्साहाने योगदान देत असल्याचेही यावेळी नमूद करण्यात आले.

स्नेहसंमेलनाच्या यशस्वी आयोजनासाठी प्राचार्य ज्योती पुरी यांच्यासह शिक्षिका रेखा जेटला, नूतन पितळे, श्रद्धा पारेख व तरुणा ढवळे यांनी विद्यार्थ्यांची उत्कृष्ट तयारी करून घेतली. कार्यक्रमाची सांगता प्रमुख पाहुणे अशोक पगारिया यांच्या प्रेरणादायी भाषणाने व आभार प्रदर्शनाने करण्यात आली.

# शुक्रवारी मनसेकडून इच्छुकांच्या मुलाखती

**अहमदनगर । रयत समाचार**

अहिल्यानगर महानगरपालिका निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर महाराष्ट्र नवनिर्माण सेना पक्षाकडून प्रभाग क्रमांक १ ते १७ मधील इच्छुक उमेदवारांच्या मुलाखती शुक्रवार ता. १९ डिसेंबर २०२५ रोजी घेण्यात येणार आहेत, अशी माहिती महाराष्ट्र नवनिर्माण सेना शहराध्यक्ष गजेंद्र राशीनकर यांनी दिली.

या मुलाखती सकाळी ११ ते दुपारी ४ वाजेपर्यंत मनसे कार्यालय, जाधव हाइट्स, सिद्धीबाग समोर, अहिल्यानगर येथे पार पडणार आहेत.

मुलाखती अहिल्यानगर जिल्हाध्यक्ष सचिन डफळ, शहर सचिव डॉ. संतोष साळवे, महिला जिल्हाध्यक्ष ॲड. अनिता दिघे, विद्यार्थी सेना जिल्हाध्यक्ष प्रकाश गायकवाड तसेच निवडणूक समितीच्या उपस्थितीत होणार आहेत. इच्छुक उमेदवारांनी अर्जासह सर्व आवश्यक मूळ कागदपत्रे सोबत आणावीत, असे आवाहन करण्यात आले आहे.

# तलाठी संघटनेचा ऑनलाईन कामकाजावर बहिष्कार

**अहमदनगर । लक्ष्मण मडके**

राज्यातील तलाठी वर्गाला ऑनलाईन कामकाजासाठी वापरण्यात येणारी लॅपटॉप, प्रिंटर व स्कॅनर यंत्रणा पूर्णत: जीर्ण व निकामी झाल्याने महाराष्ट्र राज्य तलाठी संघटनेने तीव्र नाराजी व्यक्त केली. या पार्श्वभूमीवर राज्यभरातील बहुतेक तलाठ्यांनी आपल्या व्हॉट्सॲप स्टेटसवर एकसारखी जाहीर नोटीस ठेवत संघटनेच्या आंदोलनाची माहिती जनतेच्या निदर्शनास आणून दिली. शासनाकडे वारंवार पाठपुरावा करूनही आवश्यक अद्ययावत व उच्चक्षमतेची उपकरणे उपलब्ध करून देण्यात आलेली नाहीत.

परिणामी ग्राम महसूल अधिकारी (तलाठी) यांना ऑनलाईन सेवा सुरळीतपणे पार पाडणे अशक्य होत असल्याचा आरोप तलाठी संघटनेने केला. या अन्यायकारक परिस्थितीच्या निषेधार्थ राज्यातील सर्व तलाठी व मंडळ अधिकारी यांनी ता. १५ डिसेंबर २०२५ पासून ऑनलाईन कामकाजावर बहिष्कार टाकल्याचे जाहीर करण्यात आले.

या बहिष्काराचा थेट परिणाम ७/१२ व ८-अ उतारे वितरण, ई-पीक पाहणी नोंदणी, ई-फेरफार प्रक्रिया, ऑनलाईन वाहन तपासणी तसेच शेतकरी ओळखपत्र मंजुरी यांसारख्या अत्यावश्यक ऑनलाईन सेवांवर होणार आहे. त्यामुळे शेतकरी, जमीनधारक व सर्वसामान्य नागरिकांना काही काळ गैरसोयीला सामोरे जावे लागण्याची शक्यता व्यक्त करण्यात येत आहे.

राज्य तलाठी संघटनेने जाहीर नोटिशीद्वारे नागरिकांची दिलगिरी व्यक्त करत, हा लढा कोणत्याही व्यक्ती अथवा घटकाविरोधात नसून शासनाचे लक्ष गंभीर प्रश्नांकडे वेधण्यासाठी असल्याचे स्पष्ट केले आहे. आवश्यक साधनसामग्री व अद्ययावत उपकरणे उपलब्ध झाल्यास ऑनलाईन सेवा अधिक वेगवान, पारदर्शक व प्रभावीपणे राबविता येतील, असे संघटनेचे म्हणणे आहे.

सध्या जाहीर नोटीस चर्चेचा विषय ठरली असून, बहुतेक तलाठ्यांच्या व्हॉट्सॲप वर ती झळकत असल्याने तलाठी संघटनेच्या असंतोषाची तीव्रता स्पष्टपणे दिसून येत आहे.


रयत समाचार Classified छोटी जाहिरात

छोटी जाहिरात, उत्तम प्रतिसाद

खरेदी विक्री । नोकरी विषयक । नावात बदल

आरोग्य विषयक । वाढदिवस । विवाह विषयक




निसार Art
सर्व प्रकारच्या व्यावसायिक क्षेत्रातील वॉल पेन्टीग जाहिरात (भिंत पेंटिंग) साठी राज्यातील नावाजलेले निसार आर्ट
7020356335 | 9860830016
पत्ता : प्लॉट नं.३, नवीन महानगरपालिकेसमोर, औरंगाबाद रोड, अ.नगर.

रावसाहेबचा चहा, एकदा पिऊन पहा!
कोतवाली पोलीसस्टेशन शेजारील सुप्रसिध्द
जगदंबा टी सेंटर
चहा, कॉफी, लेमन टी
शाखा नं.१- माणिक चौक, अ.नगर
शाखा नं.२- वसंत टॉकीजजवळ, भोला पान सेन्टर शेजारी, अ.नगर
प्रो.प्रा. रावसाहेब ठोंबे
97655 58585

दैनिक रयत समाचार
अहमदनगर जिल्हा आवृत्तीसाठी...
त्वरित नियुक्त करणे आहेत
१४ तालुका प्रतिनिधी, १४ शहर प्रतिनिधी, १५ प्रेस फोटोग्राफर, १४ तालुक्यात किमान ५ ते ७ ग्रामीण वार्ताहर.
अनुभवींना प्राधान्य!
इच्छुकांनी जाहिरात प्रसिद्ध झाल्यानंतर सात दिवसाच्या आत मानधनाच्या अपेक्षेसह मा. संपादक यांच्या नावे अर्ज करावा अर्ज या क्रमांकावर व्हॉटसअप करावा : 8805401800
आम्ही काय देणार
* पत्रकार म्हणून निवड झाल्यानंतर नियुक्तीपत्र, (Appointment letter) दैनिकाचे ओळखपत्र (PRESS I. Card)
एकाच वेळी प्रिंट व डिजिटल मिडियात काम करण्याची संधी.

सर्व प्रकारच्या छोट्या जाहीरातींसाठी ८८०५४०१८०० | ७७७४००१८०० | ९८२२४९६६६४ या क्रमांकावर संपर्क करा

दैनिक रयत समाचारचा ख्रिसमस विशेषांक
गुरूवार, ता.२५ डिसेंबर रोजी प्रसिद्ध होत आहे
ख्रिसमस विशेषांक
अंकासाठी लेख, माहिती, जाहीराती पाठवाव्यात
अतिथी संपादक
सॅम्युअल वाघमारे
8788412780
संपादक
भैरवनाथ वाकळे
8805401800
रयत समाचार महाराष्ट्र, गोवा, कर्नाटक
जाहीरात पाठविण्यासाठी संपर्क क्रमांक
भैरवनाथ- ८८०५४०१८००, दिपक- ७७७४००१८००,
तुषार- ७९७२३४४४७४, पंकज-९८२२४९६६६४


हे दैनिक प्रकाशक, मालक, संपादक, भैरवनाथ तुकाराम वाकळे, 8805401800 यांनी मुद्रक आबीदखान दुलेखान यांच्या मखदुम प्रिंटर्स,३५८८, माणिक चौक, अहमदनगर येथे छापून तेथेच प्रसिध्द केले. कार्यालयाचा पत्ता : ५, गजानन अपार्टमेंट, झोपडी कॅन्टीन, मनमाडरोड, सावेडी, अहमदनगर-०३.कार्यालय, 8805401800 Email : rayatsamachar007@gmail.com , उपसंपादक : दिपक शिरसाठ, 7774001800, समूह संपादक : प्रभाकर ढगे, पणजी, गोवा, 9373021584, गोवा कार्यालय : १३१, गोमंतक प्रेस जवळ, सांतिनेज, पणजी - गोवा, कर्नाटक कार्यालय : श्रीकांत काकतीकर, निवासी संपादक,१९१, बॅ.नाथ पै चौक, पोस्ट ऑफीसच्या मागे, शहापूर, बेळगाव कर्नाटक, 9036799516,shrikantkaktikar@gmail.com (वाद-विवाद अहमदनगर न्यायालयीन न्यायकक्षेत)

# स्नेहलता कोल्हेंबद्दल एकेरी व खोटे आरोप निंदनीय– सुरेखा राक्षे

## काका कोयटे यांचा महिलांकडून निषेध

**कोपरगाव । किसन पवार**

नुकत्याच झालेल्या एका प्रचारसभेत राष्ट्रवादी काँग्रेसचे नगराध्यक्षपदाचे उमेदवार काका कोयटे यांनी स्नेहलता कोल्हे यांच्याबाबत खोटे आरोप करत एकेरी उल्लेख केल्याचा प्रकार अत्यंत निंदनीय असून तो महिलांचा अवमान करणारा आहे, अशी तीव्र टीका माजी नगराध्यक्षा सुरेखा राक्षे यांनी केली.

कोपरगाव मतदारसंघातून प्रथम महिला आमदार होण्याचा मान स्नेहलता कोल्हे यांना मिळाला आहे. राजकारणात नसतानादेखील त्यांनी महिलांच्या सक्षमीकरणासाठी भरीव कार्य केले. बचत गटांच्या माध्यमातून महिलांना उद्योग, प्रशिक्षण देत आर्थिकदृष्ट्या स्वावलंबी करण्याचे कार्य त्यांनी सातत्याने केले असून हे कार्य आजही सुरू आहे, असे राक्षे यांनी सांगितले.



महिला गारमेंट क्लस्टरच्या माध्यमातून शेकडो महिलांना रोजगार उपलब्ध करून देण्यात आला. तसेच ग्रामीण भागातील पहिले कॉल सेंटर सुरू करून हजारो युवतींना स्थानिक पातळीवर रोजगाराच्या संधी मिळवून देण्यात आल्या. विविध व्यावसायिक अभ्यासक्रम सुरू करून महिलांना न्याय दिला असताना, या वयात काका कोयटे यांनी अशा प्रकारची वक्तव्ये करणे शोभणारे नाही, अशी टीकाही त्यांनी केली.

महिलांच्या प्रश्नांची पंचवीस वर्षे आठवण न येता केवळ निवडणुकीच्या काळातच 'अगरबत्ती' आठवू लागते, असा टोलाही त्यांनी लगावला.

शहरात डॉ. बाबासाहेब आंबेडकर वाचनालय, पोलीस स्टेशन, पंचायत समिती, नगरपालिका, बस स्थानक, अग्निशमन केंद्र, गोकुळनगरी पूल, हद्दवाढ भागातील विकासकामे, बाजार ओटे आदी महत्त्वाची कामे झाली असून ती सध्याच्या विरोधकांना दिसत नसल्याचा आरोपही राक्षे यांनी केला. कोल्हे-विरोधाची काविळ झाल्यामुळेच त्यांना विकास दिसत नसल्याचा आरोप त्यांनी केला. एखाद्या जबाबदार पदावर असलेल्या महिला लोकप्रतिनिधीबद्दल 'त्या बाई' असा एकेरी उल्लेख करत खोटे आरोप करणे अत्यंत निषेधार्ह असून, समस्त महिला वर्गाच्या वतीने काका कोयटे यांचा तीव्र निषेध व्यक्त करीत असल्याचे माजी नगराध्यक्षा सुरेखा राक्षे यांनी शेवटी स्पष्ट केले.

> स्नेहलता कोल्हे यांचे महिला वर्गाशी विश्वासाचे नाते असून, त्या नात्याला तडा जावा व त्यातून मते मिळावीत, असा निंदनीय प्रयत्न विरोधकांकडून केला जातोय. खोटी बदनामी करून राजकीय पोळी भाजण्याचा हा प्रकार भारतीय नारीशक्तीचा अवमान करणारा असल्याचे राक्षे यांनी सांगितले.

# सोनई ग्रामपंचायतकडून 'सालबर्डी' टीमचा सन्मान

**नेवासा । विजय खंडागळे**

सोनई ग्रामपंचायतीस 'सालबर्डी' चित्रपटाच्या टीमने नुकतीच सदिच्छा भेट दिली. यावेळी सोनई ग्रामपंचायतीच्या वतीने ग्रामपंचायत सदस्य अंबादास राऊत यांनी चित्रपटाच्या टीमचा सत्कार केला.

गेल्या दोन दिवसांपासून 'सालबर्डी' चित्रपटाचे चित्रीकरण सोनई, हिंगोणी व कांगोणी परिसरात सुरू होते. या परिसरातील नैसर्गिक सौंदर्य व वातावरण पाहून चित्रपटाचे दिग्दर्शक रमेश चौधरी यांनी समाधान व्यक्त केले.

> 'सालबर्डी' हा चित्रपट लवकरच प्रेक्षकांच्या भेटीला येत असून, या चित्रपटाची कथा सर्वसामान्यांच्या मनाला भावणारी व आवडणारी असेल. याबाबत सविस्तर वार्तालाप लवकरच करणार असल्याचे दिग्दर्शक रमेश चौधरी यांनी पत्रकार विजय खंडागळे यांच्याशी बोलताना सांगितले

'सालबर्डी' हा चित्रपट लवकरच प्रेक्षकांच्या भेटीला येणार असून, सोनई परिसरात झालेले चित्रीकरण चित्रपटाला वेगळी ओळख देईल, असा विश्वासही त्यांनी व्यक्त केला.

या चित्रपटाचे लेखन व दिग्दर्शन रमेश चौधरी यांनी केले असून छायांकन सिद्धेश मोरे यांनी सांभाळले. गीतकार म्हणून गुरु ठाकूर तर संगीतकार म्हणून पद्मनाभ गायकवाड यांनी काम पाहिले. चित्रपटात मुख्य भूमिकेत पूजा सावंत, सोनाली कुलकर्णी, गश्मीर महाजन, अंशुमन विचारे, भारत गणेशपुरे, कमलाकर सातपुते, शशांक शेंडे, ओंकार भोजने आदी कलाकारांनी भूमिका साकारल्या. तसेच या चित्रपटासाठी आनंदी जोशी व अजय गोगावले यांनी पार्श्वगायन केले.

या चित्रपटाचे कार्यकारी निर्माता दीपक कुदळे असून लाइन प्रोड्यूसर म्हणून संजय वैरागर यांनी जबाबदारी सांभाळली आहे. 'सालबर्डी' चित्रपटाच्या प्रदर्शनाबाबत प्रेक्षकांमध्ये उत्सुकता निर्माण झाली असून, या चित्रपटाच्या माध्यमातून परिसरातील अनेक कलाकार व ठिकाणे मोठ्या पडद्यावर दिसणार आहेत.

# ईव्हीएम स्ट्राँगरूममध्ये कडक बंदोबस्त

## निकालासाठी 'वेट अँड वॉच'



**शेवगाव । लक्ष्मण मडके**

ता. २ डिसेंबर रोजी नगरपरिषदेची निवडणूक शांततेत पार पडली. मात्र राज्यातील काही नगरपरिषद व स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांबाबत न्यायालयीन प्रक्रिया सुरू असल्याने, नियोजित ३ डिसेंबरऐवजी नगरपरिषद निवडणुकीचा निकाल २१ डिसेंबर रोजी जाहीर करण्यात येणार आहे.

या पार्श्वभूमीवर २ डिसेंबर रोजी झालेल्या मतदानासाठी वापरण्यात आलेल्या सर्व ईव्हीएम (इलेक्ट्रॉनिक व्होटिंग मशीन) सुरक्षितपणे स्ट्राँगरूममध्ये ठेवण्यात आल्या असून, त्या ठिकाणी कडेकोट पोलीस बंदोबस्त तैनात करण्यात आला. स्ट्राँगरूम परिसरात कोणतीही अनुचित घटना घडू नये यासाठी २४ तास सीसीटीव्ही कॅमेऱ्यांद्वारे थेट निगराणी ठेवण्यात येत आहे. विशेष म्हणजे, सर्वसामान्य नागरिक तसेच निवडणूक लढविणाऱ्या उमेदवारांनाही ईव्हीएमच्या सुरक्षेबाबत पारदर्शक माहिती मिळावी, या उद्देशाने शेवगाव तहसील कार्यालयाबाहेर मोठ्या स्क्रीनवर सीसीटीव्ही कॅमेऱ्यांचा लाईव्ह फीड दाखविण्याची व्यवस्था करण्यात आली. या स्क्रीनवरून स्ट्राँगरूममधील बंदोबस्त किती कडक आहे, आत कोणी प्रवेश करत आहे का, तसेच ईव्हीएम मशीनला कोणत्याही प्रकारची छेडछाड होत आहे का, यावर २४ तास थेट नजर ठेवता येत आहे. या पारदर्शक व्यवस्थेमुळे नागरिकांमध्ये विश्वासाचे वातावरण निर्माण झाले असून, निवडणूक प्रक्रियेबाबत कोणताही संशय निर्माण होणार नाही, याची विशेष काळजी प्रशासनाकडून घेतली जात आहे. दरम्यान, रयत समाचारचे शेवगाव प्रतिनिधी लक्ष्मण मडके यांनी तहसील कार्यालयाबाहेर उभारण्यात आलेल्या सीसीटीव्ही लाईव्ह स्क्रीनचे छायाचित्र टिपले असून, त्यामधून ईव्हीएम सुरक्षेची प्रत्यक्ष स्थिती स्पष्टपणे दिसून येते.

दरम्यान, २० डिसेंबर रोजी नगरपरिषदेच्या उर्वरित प्रभागांमध्ये तसेच इतर ठिकाणी मतदान होणार आहे. त्यामुळे आतापर्यंत मतदान झालेल्या प्रभागांतील उमेदवार सध्या 'वेट अँड वॉच'च्या भूमिकेत असून, निकालाबाबत उत्सुकता शिगेला पोहोचली आहे. काही ठिकाणी निकालाबाबत सट्टा लावल्याच्या चर्चांनाही उधाण आले असल्याचे बोलले जात आहे.

एकूणच नगरपरिषद निवडणूक प्रक्रियेची विश्वासार्हता अबाधित ठेवण्यासाठी प्रशासनाकडून अत्यंत पारदर्शक, सुरक्षित व काटेकोर उपाययोजना राबविण्यात येत असून, निकालाच्या दिवसाकडे सर्वांचे लक्ष लागून राहिले आहे.

# राष्ट्रवादी काँग्रेसच्या जिल्हा उपाध्यक्षपदी जालिंदर येळवंडे

**नेवासा । विजय खंडागळे**

सोनई येथील प्रगतशील शेतकरी व सामाजिक कार्यकर्ते जालिंदर गोरक्षनाथ येळवंडे यांची राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी (शरदचंद्र पवार) पक्षाच्या अहिल्यानगर जिल्हा उपाध्यक्षपदी नियुक्ती करण्यात आली आहे. पक्षाचे जिल्हाध्यक्ष माजी आमदार दादाभाऊ कळमकर यांच्या स्वाक्षरीने त्यांना नियुक्तीपत्र देण्यात आले.

राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे अध्यक्ष खासदार शरद पवार यांच्या विचारांवर निष्ठा ठेवून जालिंदर येळवंडे हे गेल्या अनेक वर्षांपासून पक्षाचे कार्य करत आहेत. यापूर्वी त्यांनी पक्षात उपाध्यक्ष म्हणून काम केले असून सामाजिक व राजकीय क्षेत्रातील त्यांना मोठा अनुभव आहे. त्यांच्या कार्याची व पक्षनिष्ठेची दखल घेऊन त्यांची पुन्हा जिल्हा उपाध्यक्षपदी नियुक्ती केली.



आपल्या निवडीबाबत प्रतिक्रिया देताना येळवंडे यांनी सांगितले की, युवकांसाठी ठिकठिकाणी शाखा स्थापन करून रोजगाराच्या प्रश्नावर लक्ष केंद्रित केले जाईल. तसेच शेतकऱ्यांचे शेतीविषयक प्रश्न मार्गी लावण्यासाठी प्राधान्याने काम करण्यात येईल.

येळवंडे यांच्या निवडीबद्दल खासदार निलेश लंके, प्राजक्त तनपुरे, दादाभाऊ कळमकर तसेच नेवासा तालुक्याचे राष्ट्रवादी काँग्रेस तालुकाध्यक्ष सतीश थोरात यांनी त्यांचे अभिनंदन केले.

# सोनामियां वलीसाहेब उरूस उत्साहात

**शेवगाव । लक्ष्मण मडके**



सामाजिक सलोख्याची ओळख ठरलेल्या हजरत सय्यद सोनामियां वलीसाहेब यांच्या उरूसोत्सवात यंदा श्रद्धा, परंपरा आणि आनंद यांचे सुंदर संमेलन पाहायला मिळाले. तीन दिवस चाललेल्या या उरूसोत्सवामुळे संपूर्ण शहर भक्तिमय वातावरणात न्हाऊन निघाले.

शनिवार, ता. १३ रोजी पारंपरिक संदल मिरवणुकीने उरूसोत्सवाला प्रारंभ झाला. रविवार, ता. १४ छबिन्याचे आयोजन करण्यात आले, तर सोमवार, ता. १५ रोजी मुख्य यात्रेने उरूसाची सांगता झाली. या कालावधीत दर्ग्यावर दर्शनासाठी भाविकांची मोठी गर्दी उसळली होती. अहिल्यानगर जिल्ह्यासह बाहेरील जिल्ह्यांतून आलेल्या भाविकांनी श्रद्धेने माथा टेकवत वलीसाहेबांना अभिवादन केले. यात्रेनिमित्त उभारण्यात आलेले खेळणी, मिठाई व विविध खाद्यपदार्थांचे स्टॉल तसेच पाळण्यांमुळे परिसरात उत्साही वातावरण निर्माण झाले होते. लहानग्यांपासून ज्येष्ठांपर्यंत सर्वांसाठी हा उरूसोत्सव आनंदाची पर्वणी ठरला. तरुण मंडळांच्या वतीने काढण्यात आलेल्या फुलांच्या चादर मिरवणुकांनी विशेष आकर्षण ठरवले. बँड पथकांच्या सादरीकरणामुळे मिरवणुकांना वेगळीच रंगत लाभली. सुरेल संगीत व कलात्मक वादनामुळे नागरिक मंत्रमुग्ध झाले. उरूसोत्सवाच्या काळात शांतता व सुव्यवस्था राखण्यासाठी पोलीस निरीक्षक संतोष मुटकुळे यांच्या नेतृत्वाखाली चोख पोलीस बंदोबस्त ठेवण्यात आला होता. कोणताही अनुचित प्रकार न घडता हा उरूसोत्सव आनंद, श्रद्धा व हिंदूमुस्लिम ऐक्याच्या वातावरणात यशस्वीरीत्या पार पडला.

# शैक्षणिक सहलीतून ऐतिहासिक वारसाची ओळख होते- प्रा. प्रसाद पाटील



**श्रीगोंदा । माधव बनसुडे**

शैक्षणिक सहलींच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना ऐतिहासिक वारसा, भौगोलिक वैशिष्ट्ये, थोर समाजसुधारक तसेच राष्ट्रीय नेत्यांच्या जन्मभूमीची ओळख होते आणि हा वारसा पुढील पिढीपर्यंत जपला जातो, असे प्रतिपादन श्रीगोंदा येथील शारदा विद्या निकेतनच्या एन. एस. गुळवे ज्युनिअर कॉलेजचे प्रा. प्रसाद पाटील कोभळीकर यांनी केले.

सन २०२५२६ या शैक्षणिक वर्षात आयोजित करण्यात आलेल्या शैक्षणिक सहलीदरम्यान विद्यार्थ्यांनी ऐतिहासिक सिंधुदुर्ग किल्ल्याला भेट दिली. या सहलीदरम्यान विद्यार्थ्यांनी कोल्हापूर येथील महालक्ष्मी मंदिर, रंकाळा तलाव, कृषी महाविद्यालय, जोतिबा, पन्हाळा किल्ला, नाणिज, राजकोट किल्ला, कुणकेश्वर मंदिर, पावस, देवबाग बीच तसेच सावंतवाडी येथील सुप्रसिद्ध लाकडी खेळणी उद्योग आदी ठिकाणांना भेटी दिल्या.

कृषी महाविद्यालयात प्रा. डॉ. पतंगे यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. कृषी क्षेत्राला भविष्यात चांगले दिवस येणार असून विद्यार्थ्यांनी कृषी क्षेत्राकडे वळले पाहिजे, असे मत त्यांनी व्यक्त केले. विविध ऐतिहासिक, धार्मिक व शैक्षणिक स्थळांना भेटी दिल्यामुळे विद्यार्थ्यांमध्ये उत्साह व जिज्ञासा निर्माण झाल्याचे चित्र दिसून आले.

ही शैक्षणिक सहल यशस्वी करण्यासाठी संस्थाध्यक्ष प्रा. दीपक होनराव, प्राचार्य बी. टी. मखरे, कॉलेज विभाग प्रमुख प्रा. कांचन कुरुमकर यांच्यासह प्रा. रेशमा घोडके, प्रा. राम सोनवणे, प्रा. अतुल सूर्यवंशी, प्रा. आशा सुद्रिक, प्रा. सचिन जगदाळे, प्रा. योगेश गायकवाड, प्रा. दिनेश झगडे, प्रा. ऋषिकेश जाधव व प्रा. रोहित मखरे यांनी विशेष परिश्रम घेतले.

# नेत्र तपासणी व मोतीबिंदू शस्त्रक्रिया शिबिरास उत्स्फूर्त प्रतिसाद

## आनंदऋषीजी नेत्रालय, अनुलोम संस्था यांचा उपक्रम



**कोपरगाव । किसन पवार**

आनंदऋषीजी नेत्रालय व अनुलोम संस्था यांच्या संयुक्त विद्यमाने कोपरगाव तालुक्यातील पोहेगाव येथे आयोजित नेत्र तपासणी व मोतीबिंदू शस्त्रक्रिया शिबिरास नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला. या शिबिराचे आयोजन अनुलोम विभाग प्रमुख शिरीष भालेराव व विभाग संवादनी प्रमुख सुनंदा आदीक यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आले. उपविभाग प्रमुख किशोर टेके तसेच डॉ. जगदीश झंवर यांचे मोलाचे सहकार्य लाभले.

शिबिरामध्ये अत्याधुनिक संगणकीय पद्धतीने नागरिकांच्या डोळ्यांची तपासणी करण्यात आली. गरजू रुग्णांना मोफत चष्म्यांचे वाटप करण्यात आले, तसेच मोतीबिंदू रुग्णांना शस्त्रक्रियेबाबत सविस्तर माहिती व मार्गदर्शन करण्यात आले.

शिबिराच्या उद्घाटनप्रसंगी पोहेगावचे उपसरपंच अमोल औताडे, भागीनाथ गायकवाड, सुभाष आहेर, आण्णासाहेब शिंदे, मिलिंद झगडे, कैलास घुमरे यांच्यासह ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

या शिबिरात एकूण १४० रुग्णांना चष्म्यांचे वाटप करण्यात आले. तपासणीदरम्यान ७ रुग्णांना मोतीबिंदू शस्त्रक्रियेची आवश्यकता असल्याचे निदर्शनास आले, तर ४ रुग्णांमध्ये टेरीझमचे निदान झाले. संबंधित रुग्णांना पुढील उपचार व शस्त्रक्रियेसाठी आवाहन करण्यात आले आहे.

याप्रसंगी आनंदऋषीजी नेत्रालयाच्या वतीने डॉ. सागर देवकर, डॉ. भाऊसाहेब आदमाने, डॉ. शितल उरुणकर, डॉ. राजू धोत्रे आदी तज्ज्ञ डॉक्टरांनी रुग्णांची तपासणी करून आवश्यक मार्गदर्शन केले. या उपक्रमामुळे ग्रामीण भागातील नागरिकांना दर्जेदार नेत्रसेवा उपलब्ध झाल्याने समाधान व्यक्त करण्यात आले.

# जागा नसलेल्यांनाही घरकुल; ५० हजार अनुदान

**बेलापूर । शफीक बागवान**

ग्रामीण भागातील अनेक गरीब कुटुंबांकडे स्वतःची जागा नसल्यामुळे आतापर्यंत त्यांना घरकुल योजनांचा लाभ घेता येत नव्हता. परंतु आता अशा लाभार्थ्यांसाठी शासनाकडून मदत दिली जाणार असून त्यांना घर बांधण्यासाठी जागा खरेदी करता यावी, यासाठी शासनाकडून ५० हजार रुपये अनुदान दिले जाणार आहे. जागेच्या खरेदीची नोंदणीकृत कागदपत्रे सादर केल्यानंतर हे अनुदान थेट लाभार्थ्यांच्या बँक खात्यात जमा होईल. घरकुलासाठी किमान ६०० चौरस फूट भूखंड असणे आवश्यक आहे. त्यावर किमान ३२३ चौरस फूट ते कमाल ४८५ चौरस फूट क्षेत्रफळाचे घर बांधणे बंधनकारक असून स्वयंपाकघर, एक किंवा दोन खोल्या आणि शौचालय असणे अनिवार्य आहे. क्षेत्रफळ ठरावीक मर्यादेत ठेवण्यात आले असून सर्व लाभार्थ्यांना किमान सुविधा मिळाव्यात, हा यामागील उद्देश आहे.

घरकुल योजनेच्या निकषांमध्येही बदल करण्यात आले असून दुसऱ्या टप्प्यात भूखंडाचे माप, घराचे क्षेत्रफळ आणि बांधकामाची रचना याबाबत अटी अधिक स्पष्ट करण्यात आल्या आहेत.

या योजनेअंतर्गत केंद्र आणि राज्यसरकार संयुक्तपणे आर्थिक मदत करतात.

> **गरीब जनतेला आधार**
>
> अनेक गावांमध्ये वस्ती दाट झालेली असून जागेची उपलब्धता कमी आहे. तसेच मालकी हक्कासंबंधी अडचणीही आहेत. अशा परिस्थितीत योग्य भूखंड मिळवणे कठीण होत असल्याने जागा खरेदीसाठी मिळणारे हे अनुदान ग्रामीण गरीब कुटुंबांसाठी आधार ठरणार आहे.
>
> – **विक्रम नाईक**, हरिहर फाऊंडेशन

# किस्से निवडणुकीचे...

**सलीमखान पठाण**

## जोडीदार सापडलेत संशयाच्या भोवऱ्यात

श्रीरामपूर नगरपालिकेची निवडणूक होऊन आता पंधरा दिवस उलटले आहेत. मतमोजणी लांबल्याने निकालाची उत्कंठा शिगेला पोहोचली असून सर्व उमेदवार, त्यांचे नेते, कार्यकर्ते तसेच सर्वसामान्य मतदारही २१ तारखेची आतुरतेने वाट पाहत आहेत. दरम्यान, सध्या उगवणारा प्रत्येक दिवस नवनवीन वार्ता घेऊन येत असल्याने उमेदवारांचा जीव टांगणीला लागला आहे. या निवडणुकीत प्रत्येक प्रभागातून दोन उमेदवार निवडून द्यावयाचे असल्याने प्रत्येक पक्षाने दोन उमेदवार दिले आहेत. मात्र उमेदवारी देताना काही ठिकाणी ताळमेळ न बसता ओढून-ताणून जोड्या बसवण्यात आल्याचे चित्र दिसून येत आहे. खर्चाच्या बाबतीत एकाच प्रभागात एक उमेदवार सबल तर दुसरा कंगाल अशी जोडी लागल्याने या उमेदवारांमध्येच आता सुंदोपसुंदी सुरू झाल्याची चर्चा आहे. काही अपक्ष उमेदवारांना नगराध्यक्षपदाच्या उमेदवारांकडून आर्थिक रसद पुरविण्यात आल्याच्याही चर्चा रंगत आहेत. अपक्षांनी स्वतःसाठी एकच मत मागितले, मात्र वरचे मत अमुक उमेदवारासाठी मागितले, तसेच तडजोड केली, अशाही चर्चा ऐकायला मिळत आहेत. एकाच प्रभागातून एकाच पक्षाकडून निवडणूक लढविणाऱ्या दोन उमेदवारांनी शेवटच्या टप्प्यात वैयक्तिक प्रचार करून फक्त स्वतःसाठीच मत मागितल्याचेही बोलले जात आहे. दोन उमेदवारांमधील हा विसंवाद मतदानाच्या दिवशी काही भागांत दिसून आला. परिणामी, एकाच प्रभागातील जोडीने लढणारे उमेदवार आता एकमेकांकडे संशयाने पाहू लागले आहेत. एका पक्षाने उमेदवार देताना केवळ आर्थिकदृष्ट्या प्रबळ उमेदवारांचाच विचार केला. उमेदवाराची सामाजिक पत, वैचारिक पातळी व जनमानसातील स्थान याकडे दुर्लक्ष झाल्याची चर्चा नागरिकांमध्ये आहे. तर दुसरीकडे पक्षाच्या ध्येयधोरणांना तिलांजली देऊन निष्ठावंतांना डावलून उमेदवारी दिल्याचेही बोलले जात आहे. अचानक जागा वाढल्याने उमेदवारी कोणाला द्यावी, असा प्रश्न निर्माण झाला आणि शेवटच्या टप्प्यात जो सापडेल त्याला उमेदवारी देऊन घोड्यावर बसविण्यात आल्याचेही चर्चिले जात आहे. एका पक्षाने स्वतंत्रपणे लढण्याचा निर्णय घेतला; मात्र सर्व प्रभागांत उमेदवार उभे करण्यात अपयश आल्याने काहींना जबरदस्तीने उमेदवारी देण्यात आली. ''फक्त फॉर्म भरा, प्रचार करू नका. पूर्ण पॅनल दाखवायचा आहे,'' असे सांगून काही कार्यकर्ते तयार करण्यात आल्याचीही चर्चा आहे. स्थानिक नेत्यांचा शब्द प्रमाण मानून उमेदवारी केली; परंतु प्रचार न केल्याचे प्रकारही चर्चेत आहेत. एकत्र लढलो, पण एकमेकांवर विश्वास नाही. 'तुझे माझे जमेना आणि तुझ्यावाचून करमेना' अशी अवस्था काही उमेदवारांची झाल्याचे चित्र आहे. आता नेमकी कोणती भूमिका कोणी बजावली, याचा उलगडा २१ तारखेला मतमोजणीनंतरच होणार असून निकालानंतर या सर्व घडामोडींचे काय पडसाद उमटतात, याकडे शहरातील नागरिकांचे लक्ष लागले आहे.

# मूल्यशिक्षण काळाची गरज

दोन तीन महिन्यांपूर्वी झालेल्या भांडणातून दहावीच्या विद्यार्थ्याने खाजगी शिकवणी वर्गातील सहाध्यायी विद्यार्थ्याचा शिकवणी सुरू असतानाच धारधार शस्त्राने मानेवर आणि पोटावर वार करून निर्घुण खून केल्याची घटना पुणे जिल्ह्यातील राजगुरुनगर येथे सोमवारी घडली.

पुण्यासारख्या शिक्षणाच्या माहेरघरात घडलेल्या या घटनेतील आरोपी शाळकरी असल्याने सर्वत्र खळबळ माजली आहे अर्थात अल्पवयीन मुलाने केलेला हा पहिलाच गंभीर गुन्हा नाही. याआधीही असे अनेक गंभीर गुन्हे अल्पवयीन मुलांकडून घडले आहेत. मागील वर्षी पुण्यातच शाळेची बॅग फाडली या किरकोळ कारणाने एका शाळकरी विद्यार्थ्याने दुसऱ्या शाळकरी विद्यार्थ्यावर चाकूने वार केल्याची घटना घडली होती. तीन वर्षापूर्वी क्राईम मालिका पाहून एका अल्पवयीन मुलाने आपल्या आजीची हत्या केल्याची घटना पुण्यातच घडली होती. त्याच वर्षी एका आठ वर्षीय मुलाने आपल्याच पाच वर्षीय बहिणीवर ब्लेडने वार करून हत्या केल्याची घटना जालना शहरात घडली होती.



श्याम बसप्पा ठाणेदार
दौंड, जिल्हा पुणे
९९२२५४६२९५
समाजसंवाद

अल्पवयीन मुलांकडून असे गंभीर स्वरूपाचे गुन्हे घडल्याच्या बातम्या अलीकडे सातत्याने वर्तमानपत्रात वाचायला मिळतात याचाच अर्थ देशात बाल गुन्हेगारी वाढत चालली आहे. सन २०२२ - २३ या एका वर्षात एकट्या पुणे शहरात अशा प्रकारचे २४८ गुन्हे घडले असून पुण्याच्या ग्रामीण भागात १०४ गुन्हे घडले आहेत. राष्ट्रीय गुन्हे नोंदणी अहवालातच ही आकडेवारी नमूद करण्यात आली आहे.

जर एकट्या पुण्यात अल्पवयीन मुलांकडून इतके गुन्हे होत असतील तर संपूर्ण राज्यात आणि देशात अल्पवयीन मुलांकडून किती गुन्हे घडत असतील याची फक्त कल्पना केली तरी अंगावर काटा येतो. अर्थात देण्यात आलेली ही आकडेवारी फक्त नोंद झालेल्या गुन्ह्यांचीच आहे. पोलिस दप्तरी नोंदवण्यात आलेल्या गुन्ह्यांपैकी काही गुन्हे खून, बलात्कार, विनयभंग, अपहरण यासारखे गंभीर स्वरूपाचे देखील आहेत. गेल्या काही वर्षात बाल गुन्हेगारीचे प्रमाण खूप वाढले आहे. आजकालची मुले गुन्हेगार बनत आहेत ही अत्यंत धोक्याची व खेदाची बाब आहे.

झोपडपट्टीत राहणारे अल्प उत्पन्न गटातील मुले गुन्हेगारीकडे लवकर ओढले जातात असे म्हंटले जाते. त्यांचे आई वडील मोल मजुरीसाठी घराबाहेर राहतात त्यामुळे ते मुलांना योग्य संस्कार देऊ शकत नाहीत परिणामी ही मुले गुन्हेगारीकडे वळतात असा तर्क काढला जातो. पण पुण्यातील या व या आधीच्या घटनेने तसेच जालन्यातील घटनेने हा तर्क चुकीचा ठरवला आहे. या सर्व घटनेतील मुलांचे पालक उच्चशिक्षित असून हे सर्व मुले शहरातील प्रतिष्ठित शाळेतील विद्यार्थी आहेत. याचाच अर्थ सुशिक्षित पालकांचे मुलेही आता गुन्हेगारीकडे वळू लागले आहेत.

भारतासारख्या देशात वाढती बाल गुन्हेगारी ही मोठी समस्या बनली आहे. आजकालच्या मुलांमध्ये भाई, दादा, डॉन बनण्याची मोठी क्रेझ आहे. त्यामुळे ते गुन्हेगारीकडे वळत आहेत. अल्पवयीन मुलांच्या टोळ्या, गँग वाढत आहेत. पालकांचे लक्ष नसल्याने चोऱ्या, मारामारी, खून यासारख्या गुन्ह्यात अल्पवयीन मुले अडकत आहेत. या मुलांना वेळीच सल्ला किंवा मार्गदर्शन मिळत नाही ही वस्तुस्थिती आहे. देशातील बाल गुन्हेगारी वाढत आहे ही धोक्याची घंटा आहे. ती कमी करण्यासाठी मुलांना संस्कारक्षम वयात पालक, शिक्षक, समाज यांच्याकडून योग्य संस्कार व मार्गदर्शन मिळणे गरजेचे आहे.

लहान वयात मुले काय करतात, त्यांच्या आवडीनिवडी काय आहेत याचाही विचार आई वडीलांनी करायला हवा. अभ्यासाकडे मुले दुर्लक्ष का करतात याचाही विचार पालक आणि क्षिक्षकांनी करायला हवा. शिक्षणाऐवजी मुले गुन्हेगारीकडे वळत आहे ही चिंतनीय बाब आहे याला जितकी सामाजिक परिस्थिती जबाबदार आहे तितकीच कौटुंबिक परिस्थिती देखील जबाबदार आहे. आपल्या देशात जोवर एकत्र कुटुंब पद्धती होती तोवर बाल गुन्हेगारीचे प्रमाण नगण्य होते पण एकत्र कुटुंब पद्धतीचा ऱ्हास झाला आणि बाल गुन्हेगारी फोफावत गेली असे म्हटल्यास वावगे ठरणार नाही.

मुलांना चांगले शिक्षण देण्यासाठी पालक वाट्टेल ते करतात. त्यांना मोठ मोठ्या इंटरनॅशनल स्कूलमध्ये लाखो रुपये डोनेशन देऊन दाखल करतात. त्यांना हव्या त्या सर्व वस्तू पुरवतात पण मुलांसोबत वेळ घालवण्यास पालकांना फुरसत नसते. त्रिकोणी, चौकोनी कुटुंब पद्धतीत आजी आजोबा ही संकल्पना केंव्हाच मागे पडली आहे. आई वडील दोघेही नोकरीस असेल तर मुले दिवसभर घरी एकटीच असतात अशावेळी टीव्ही आणि मोबाईल हेच त्यांचे साथीदार असतात. मग दिवसभर टीव्ही वरील क्राईम मालिका पाहणे आणि मोबाईलवर हिंसक गेम खेळणे हाच त्यांचा उद्योग. दिवसभर क्राईम मालिका पाहून आणि मोबाईलवर हिंसक गेम खेळून मुलांच्या मनातही हिंसक विचार येतात. त्यातूनच मग अशा घटना घडतात.

त्यामुळेच आज मूल्यशिक्षणाची मोठी गरज निर्माण झाली आहे. आज मुलांना जितकी शिक्षणाची गरज आहे तितकीच मूल्यशिक्षणाचीही आहे. परीक्षेत मिळणाऱ्या गुणांच्या आकडेवारीत मूल्यशिक्षण हरवत चालले आहे. मुलांवर संस्कार करण्यात पालक, शिक्षक आणि समाज कमी पडत आहे. मुलांवर संस्कार होण्यासाठी मूल्यशिक्षणाला पर्याय नाही. मूल्यशिक्षण काळाची गरज बनली आहे.

# पुरणपोळी, कटाची आमटीने जिंकली देशभराची मने; 'स्वादसूत्र-२०२५'मध्ये आश्विनी कसबे-अवघडे प्रथम

**मुंबई । रयत समाचार**

प्रख्यात शेफ रॉकी मोहन यांच्या शेफपीएन या संस्थेच्या माध्यमातून आयोजित करण्यात आलेल्या 'स्वादसूत्र२०२५' या राष्ट्रीय पातळीवरील पाककला स्पर्धेत पुण्याच्या आश्विनी कसबे-अवघडे यांनी पहिला क्रमांक पटकावून मानाचा मुकुट मिळवला.

गोरेगाव येथील नेस्को सेंटर येथे भरलेल्या १७ व्या इंटरनॅशनल फूड अँड बिव्हरेज ट्रेड एक्स्पो अंतर्गत 'परंपरागत अन्नपदार्थ' या थीमवर ही स्पर्धा पार पडली. देशभरातून मोठ्या प्रमाणावर स्पर्धकांनी सहभाग नोंदवला होता. त्यातून अंतिम फेरीसाठी सहा स्पर्धकांची निवड करण्यात आली होती. अंतिम फेरीत आश्विनी कसबे-अवघडे यांनी पुरणपोळी आणि कटाची आमटी हा पारंपरिक महाराष्ट्रीयन पदार्थ सादर केला. चव, सादरीकरण आणि परंपरेशी असलेली नाळ या सर्व निकषांवर त्यांच्या पाककृतीने परीक्षकांची विशेष दाद मिळवली. स्पर्धेसाठी प्रख्यात शेफ व ब्लॉगर कुरुप दलाल, अन्नपूर्णाचे सीईओ सिद्धार्थ मोहन, शेफ राखी वासवानी, नामवंत फूड ब्लॉगर कुणाल विजयकर आणि शेफ निशाण चौबे यांनी



परीक्षक म्हणून काम पाहिले. सर्व परीक्षकांनी एकमताने आश्विनी कसबे-अवघडे यांच्या पाककलेवर पसंतीची मोहोर उमटवली.

पुण्याच्या आश्विनी कसबे-अवघडे यांच्यामुळे परंपरागत मराठी खाद्यसंस्कृतीचा देशपातळीवर गौरव होत असून, त्यांच्या यशाबद्दल सर्व स्तरांतून अभिनंदन होत आहे.

आपला वाढदिवस रक्तदानाने साजरा करा

# बिबट्यांचे वाढते हल्ले चिंताजनक; तातडीच्या उपाययोजनांची गरज- तात्यासाहेब देशमुख

**अकोले । रयत समाचार**

बिबट्यांचे वाढते हल्ले ही अत्यंत गंभीर आणि चिंताजनक बाब बनली असून, यावर वनविभाग व राज्य सरकारने तातडीने ठोस उपाययोजना कराव्यात, अशी जोरदार मागणी अकोले तालुक्यातील सामाजिक कार्यकर्ते तथा मातोश्री शांताई भाऊसाहेब देशमुख सोशल फाउंडेशनचे अध्यक्ष तात्यासाहेब अशोकराव देशमुख यांनी केली.



पूर्वी अहमदनगर जिल्ह्यातील अकोले तालुक्यातील काही ग्रामीण भागांपुरताच बिबट्यांचा प्रादुर्भाव मर्यादित होता. मात्र सध्या भक्ष्याच्या शोधात आणि बिबट्यांच्या वाढत्या संख्येमुळे ते थेट शहरी भागातील मानवी वस्त्यांमध्ये शिरत आहेत. जिल्ह्यातील अनेक तालुक्यांमध्ये लहान मुले तसेच पाळीव प्राणी बिबट्यांचे भक्ष ठरत असल्याच्या घटना सातत्याने घडत असून, नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे.

चार- पाच वर्षांच्या चिमुकल्यांवर बिबट्याचे हल्ले होत असताना शासन जर निद्रिस्त अवस्थेत असेल, तर जनतेचा उद्रेक झाल्याशिवाय राहणार नाही, असा इशारा देत तात्यासाहेब देशमुख यांनी शासनाच्या उदासीन भूमिकेवर तीव्र शब्दांत टीका केली. तोपर्यंत नागरिकांनी सजग राहून काही प्रतिबंधात्मक उपाययोजना करण्याचे आवाहन त्यांनी केले आहे. घराजवळील परिसर स्वच्छ ठेवावा, जेणेकरून कुत्रे व इतर प्राणी आकर्षित होणार नाहीत आणि बिबट्यांचा वावर टाळता येईल. तसेच घराच्या आसपास मका, गिनी गवत, ऊस यांसारखी उंच पिके लावू नयेत, कारण अशा पिकांमध्ये बिबट्या दबा धरून हल्ला करू शकतो, असे त्यांनी सांगितले. ग्रामीण भागात लहान मुलांना सायंकाळी पाच वाजल्यानंतर घराबाहेर पाठवू नये. त्यांना घरातच बुद्धिबळ, कॅरम यांसारख्या इनडोअर खेळांना प्रोत्साहन द्यावे. वस्ती व जनावरांच्या गोठ्याजवळ मोठे हॅलोजन दिवे लावून परिसर उजळ ठेवावा, कारण बिबट्या प्रकाशात येण्यास सहसा टाळाटाळ करतो व अंधारात अधिक सक्रिय असतो. जर अचानक बिबट्या समोर आला, तर हात वर करून, हातातील बॅग किंवा जॅकेट उंच धरून स्वतःला मोठे असल्याचा भास निर्माण करावा. शक्यतो बिबट्या मोठ्या माणसांवर किंवा जनावरांवर हल्ला करत नाही, असेही त्यांनी स्पष्ट केले. अंधारात व दाट झाडीत विशेषतः संध्याकाळी जाणे टाळावे. अपरिहार्य असल्यास फटाके वाजवून, मोठे आवाज करत, टॉर्च सोबत ठेवूनच जावे. गळ्याभोवती मफलर गुंडाळलेली असावी, असा सल्लाही त्यांनी दिला.

बिबट्यांच्या वाढत्या हल्ल्यांवर नियंत्रण मिळवण्यासाठी शासनाने तातडीने ठोस कृती आराखडा राबवावा, अन्यथा नागरिकांचा संयम सुटण्याची शक्यता नाकारता येत नाही, असा ठाम इशाराही तात्यासाहेब देशमुख यांनी दिला.

# धर्मादाय आयुक्त कार्यालय श्रीरामपूरला सुरू करा; मुस्लिम नेत्यांची मागणी

**श्रीरामपूर । शफीक बागवान**

उत्तर नगर जिल्ह्यासाठी स्वतंत्र धर्मादाय आयुक्त कार्यालय सुरू करावे, अशी मागणी श्रीरामपूर शहरातील मुस्लिम समाजातील नेत्यांनी केली.

मुख्यमंत्री तथा विधी व न्याय मंत्री देवेंद्र फडणवीस, पालकमंत्री राधाकृष्ण विखे यांना पाठवण्यात आलेल्या ई-मेल द्वारा निवेदनात म्हटले आहे की, सद्यस्थितीत अहिल्यानगर जिल्ह्यातील १४ तालुक्यांसाठी एकच धर्मादाय आयुक्त कार्यालय कार्यान्वित आहे. त्याचे विभाजन होणे गरजेचे असून कामाची व्याप्ती लक्षात घेता तसेच उत्तर नगर जिल्ह्यातील श्रीरामपूर सह नेवासा, कोपरगाव, शिर्डी, राहता, अकोले व संगमनेर तालुक्यासाठी श्रीरामपूर येथे धर्मादाय आयुक्तचे कार्यालय तातडीने सुरू करण्याची नितांत गरज आहे.

धर्मादाय आयुक्त कार्यालयाकडे धर्मादाय संस्थांची नोंदणी, त्यांचे नियमन आणि त्यांच्या कामावर देखरेख ठेवणे आहे. यामध्ये विश्वस्त नियुक्त करणे किंवा काढून टाकणे, ऑडिट अहवाल तपासणे आणि ऑनलाइन सेवांद्वारे अर्ज प्रक्रिया सुलभ करणे या कामांचा समावेश आहे. याशिवाय नवीन धर्मादाय संस्थांची नोंदणी आणि विद्यमान संस्थांच्या कामकाजावर लक्ष ठेवणे, धर्मादाय संस्थांनी कायद्याचे पालन करावे यासाठी मार्गदर्शन करणे आणि आवश्यक असल्यास कारवाई करणे, गैरप्रकार झाल्यास किंवा आवश्यकता वाटल्यास नवीन विश्वस्त नियुक्त करणे किंवा विद्यमान विश्वस्तांना पदावरून काढून टाकणे, संस्था नोंदणी, वर्गणी परवानगी आणि अहवाल दाखल करणे यासारख्या सेवा ऑनलाइन उपलब्ध करून देणे, धर्मादाय संस्थांच्या कामकाजात पारदर्शकता आणणे आणि जनतेचा विश्वास टिकवणे, लेखापरीक्षण अहवाल तपासणे आणि निधीचा योग्य वापर होत आहे की नाही हे पाहणे, ही व इतर अशी अनेक शेकडो कामे धर्मादाय आयुक्तच्या कार्य कक्षेत येतात. श्रीरामपूर येथे हे कार्यालय विना विलंब सत्वर सुरू झाल्यास पैसा वेळ यांची बचत होऊन उत्तर नगर जिल्ह्यातील सात ते आठ तालुका यांना जलद सेवा मिळेल, मुख्यमंत्री फडणवीस आणि पालकमंत्री विखे यांनी हे कार्यालय ताबडतोबीने सुरू करावे,

अशी ही मागणी आडत व्यापारी ताहेर बागवान, इंजि. जाहेद शेख, ख्वाजा बागवान, शफीक बागवान, फैय्याज बागवान, रियाज बागवान, सरदार बागवान, श्रीरामपूर बार असोसिएशनचे माजी अध्यक्ष ॲड. युसुफ शेख, मुख्तार शाह, ॲड. बाबा शेख, रफीक बागवान, इस्माईल शेख, नासेर बागवान, ॲड. रऊफ शेख, डॉ. सलीम शेख, ॲड. समीन बागवान, प्रा. उमर बागवान, प्रा. इकबाल काकर, संगमनेर येथील माजी नगरसेवक अनिस बागवान, अल्ताफ बागवान, आसीफ दारूवाला, अश्फाक शेख, डॉ. तोफिक शेख, बशीर पटेल, साहील पटेल, ॲड. शफी शेख, ॲड. कलीम शेख, समीर इसहाक बागवान, कलीम बागवान, अनिस कुरेशी यांनी केली.

# हातमाग विणकरांच्या सक्षमीकरणासाठी सहकार भारतीचे मार्गदर्शन

## अनंतकुमार मिश्रा यांच्या उपस्थितीत सहकार बैठक



**अहमदनगर । रयत समाचार**

हातमाग क्षेत्राच्या बळकटीकरणासाठी सहकार चळवळीची भूमिका अधिक प्रभावी करण्याच्या दृष्टीने सहकार भारतीचे राष्ट्रीय संयोजक अनंतकुमार मिश्रा यांच्या उपस्थितीत सहकार बैठक उत्साहात पार पडली. ही बैठक ता.१६ डिसेंबर रोजी पंडित दीनदयाळ नागरी सहकारी पतसंस्था येथे आयोजित करण्यात आली होती.

बैठकीत सहकारभारतीचे संचालक, कार्यकर्ते तसेच पतसंस्थेचे सभासद यांचे एकत्रीकरण व मार्गदर्शन करण्यात आले. हातमाग विणकरांच्या प्रश्नांवर सहकाराच्या माध्यमातून शाश्वत उपाय, आर्थिक स्वावलंबन, बाजारपेठेतील संधी तसेच संघटनात्मक मजबुती यावर मिश्रा यांनी सविस्तर मार्गदर्शन केले.

कार्यक्रमाच्या प्रारंभी पतसंस्थेचे चेअरमन वसंत लोढा, संचालक मिलिंद गंधे आणि अनंत होशिंग यांनी अनंतकुमार मिश्रा यांचे स्वागत केले. यावेळी पतसंस्थेचे संचालक मंडळ, सभासद आणि सहकार भारतीचे कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

सहकार चळवळ ही केवळ आर्थिक व्यवहारापुरती मर्यादित न राहता समाजघटकांच्या सर्वांगीण विकासाचे प्रभावी साधन ठरू शकते, असा विश्वास यावेळी व्यक्त करण्यात आला. हातमाग विणकरांना संघटित करून त्यांना सक्षम करण्यासाठी सहकार भारतीच्या माध्यमातून पुढील काळात विविध उपक्रम राबविण्याचा निर्धारही या बैठकीत करण्यात आला. तसेच येथील सहकार महर्षी सुवालाल गुंदेचा जैन ओसवाल पतसंस्था मर्या. येथेही बैठक घेण्यात आली.

# श्रीगोंदा सोसायटी शेतकऱ्यांची कामधेनू- सुनील बोरुडे

श्रीगोंदा । माधव बनसुडे

श्रीगोंदा विविध कार्यकारी सेवा सोसायटीच्या नुकत्याच झालेल्या निवडणुकीत चेअरमनपदी सुनील बोरुडे तर व्हाईस चेअरमनपदी हनुमंत उदमले यांची बिनविरोध निवड झाली. मंगळवार ता.१६ डिसेंबर रोजी छत्रपती शिवाजी महाराज यांच्या प्रतिमेस अभिवादन करून नुतन चेअरमन बोरुडे व व्हा. चेअरमन उदमले यांनी संस्थेचे मावळते चेअरमन पोपट कोथिंबिरे तसेच संस्थेचे ज्येष्ठ सभासद यांच्या हस्ते पदभार स्वीकारला.यावेळी बोरुडे यांनी सांगितले की, श्रीगोंदा विविध कार्यकारी सेवा सोसायटी ही शेतकऱ्यांची कामधेनू असून सहकार महर्षी शिवाजीराव नागवडे सहकारी साखर कारखान्याचे चेअरमन राजेंद्र नागवडे यांच्या मार्गदर्शनाखाली संस्थेचा कारभार पारदर्शकपणे राबवून शेतकऱ्यांच्या हितासाठी काम करण्यात येईल.या प्रसंगी संस्थेचे माजी चेअरमन, माजी व्हाईस चेअरमन, संचालक तसेच संस्थेचे सभासद मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# स्वाभिमानी असला तरी कोष्टी समाज पडतोय राजकीय अडगळीला

**पाथर्डी शहरात बहुसंख्येने स्थिरावलेल्या कोष्टी समाजाने उपजीविकेसाठी स्वकष्टार्जित साधने उपलब्ध करत इतर समाजांसमोर आदर्श निर्माण केला आहे. अन्न, वस्त्र व निवारा या मानवाच्या प्रमुख मूलभूत गरजा आहेत. यापैकी, मानवासाठी वस्त्र प्रावरणे तयार करून त्यावर उपजीविका करणारा हा समाज, औद्योगिक क्रांतीनंतर हळूहळू बेरोजगार होत गेला. परंतु, या स्थित्यंतरातून जात असताना हतबल न होता या समाजाने उपजीविकेची नवनवीन साधने उपलब्ध करत बेरोजगारीवर मात केली**



महाराष्ट्रात प्रामुख्याने देवांग कोष्टी, लाड कोष्टी, स्वकुळ साळी, साळेवार, सुतसाळी, पद्मसाळी व गधेवाल, देशकर अशा जवळपास १५ पोटजाती आहेत. यांपैकी, पाथर्डी शहरात प्रामुख्याने देवांग, जुंजरी, हडगर व लिंगायत या पोटजाती वास्तव्यास आहेत. वरकरणी या विविध जाती पडलेल्या दिसत असल्या तरी त्या एकाच मूळच्या समाजातून व्यवसाय कौशल्यातील भिन्नतेमुळे निर्माण झाल्या आहेत. ''कोष्टी'' हे जातीनाम कोसा अथवा कोष (रेशीम अथवा कापसाचा) यांपासून वस्त्रे बनवणाऱ्यांना लाभले.

पाथर्डी शहरात वास्तव्यास असलेल्या कोष्टी समाजाने प्राप्त परिस्थितीशी जुळवून घेताना व्यवसाय व रोजगाराच्या वाटा चोखाळत परिस्थितीवर मात केली. आजमितीला हा समाज हॉटेल, बाजार, खानावळी व मोलमजुरी करताकरता आदर्श जीवन जगत आहे. कालौघात, परिस्थिती सुधारल्यानंतर या समाजाने शिक्षणाची गरज ओळखून नवीन पिढीला शिक्षणाभिमुख केले. परिणामी, काही कुटुंबातील तरुणांना सरकारी सेवा करण्याची संधीही मिळाली.

तेलंगणा राज्याचे अतिरिक्त पोलिस महासंचालक महेश भागवत हे याच समाजाचं भूषण व पाथर्डीचं वैभव आहेत. अतिशय बिकट परिस्थितीवर मात करत सुमारे ५०० महिला बचत गटांच्या माध्यमातून हजारो महिलांच्या जीवनात उत्कर्षाचा दीप प्रज्वलित केलेल्या भारती असलकरही याच समाजातील आहेत. पाथर्डी तालुक्याचे पहिले आमदार स्वर्गीय माधवराव निऱ्हाळीही याच समाजातील होते. स्वर्गीय प्रभाकर भागवत व मुरलीधर गुरसाळी हे देखील याच समाजातील मोठ्या उंचीवर पोहोचलेले व्यक्तिविशेष, गंगाधर कुलट, जालिंदर तारळकर, डॉ. अविनाश भागवत, कॅप्टन मुकुंद भागवत व डॉ. सागर भागवत प्रभृतींनी कोष्टी समाजाचे नांव मोठ्या उंचीवर नेऊन ठेवले आहे. कष्टाच्या बळावर चौंडेश्वरी देवीचे मंदिर व सांस्कृतिक सभागृह निर्माण करताना या समाजाने कुणापुढेही हात पसरले नाहीत.

माघ शुद्ध नवमीला हा समाज चौंडेश्वरी देवीचा उत्सव मोठ्या थाटामाटात साजरा करतो. यावेळी सर्व कोष्टी समाज बांधव एकत्र येतात. दोन दिवस चालणाऱ्या या उत्सवात सहभागी झाल्यामुळे विविध प्रकारच्या धार्मिक, समाज प्रबोधन व महिला सुरक्षेसारख्या विषयांवर चर्चा केली जाते. शहराच्या मध्यवर्ती भागात असलेल्या या दोन्ही वास्तुंत समाजाचा एकोपा, चालीरीती, परंपरा व संस्कृतीचं प्रदर्शन होतं. नाविन्यपूर्ण उपक्रम हाती घेताना ''खेळ पैठणीचा'' व अन्य उत्सव साजरे करत या समाजाने प्रवाहीपणा जपला आहे



राजेंद्र देवढे
विशेष प्रतिनिधी
९८२२७४७३२०
राज की बात

स्वर्गीय आमदार माधवराव निऱ्हाळी यांच्यानंतर या समाजाला नगराध्यक्ष पदावर विराजमान होण्याची संधी चालून आली होती. परंतु, दुर्दैवाने कोष्टी बांधवांना या संधीचं सोनं करता आलं नाही. ते का करता आलं नाही, हा या लेखाचा उद्देश नसला तरी हा समाज स्वाभिमानी व कष्टाळू असूनही राजकीय अडगळीलाच पडत आहे.

औद्योगिक क्रांतीपूर्वी भरभराटीला आलेला कोष्टी समाज, औद्योगिक क्रांतीनंतर आलेल्या बेरोजगारीने खचला नाही. याउलट, परिस्थितीवर मात करत या समाजाने स्वाभिमान न गमावता अन्य समाजांसमोर आदर्श प्रस्थापित केला.